जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर.
ईमेल :- cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र. ९८१९२०८२७९

'' प्रेस नोट ''

दि. ०१/०४/२०२६

'' ३ कोटी रूपये किंमतीच्या सोन्याच्या लगडी व १७ लाख ५० हजार रूपये रोख रक्कम हस्तगत सराफांची व ग्राहकांची फसवणुक करून सोने घेवून पळून जाणाऱ्या आरोपीस अटक,''

'' गुन्हे शाखा, घटक-१, ठाणे ची कामगिरी ''

----------oooo0oooo----------

सन २०२५ मध्ये ऐन दिपावली सानाव्यावेळी ठाणे व भिवंडी शहरातील सराफी व्यापाऱ्यांना ए वन क्वॉलिटीचे शुध्द सोने येणार असल्याचे भासवुन त्यांच्या व्यवसायात चांगला फायदा होईल असे खोटे प्रलोभन दाखवून तक्रारदार व्यापारी यांची फसवणुक झालेबाबत ठाणेनगर पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर ६५३/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१६(५), ३१८(४), ६१(२), ३(५) प्रमाणे दिनांक २९/१०/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. तसेच त्यापुर्वी सदर आरोपी विरूध्द ठाणेनगर पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर ६४३/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१६, ३१८(४) प्रमाणे दिनांक १७/१०/२०२५ रोजी दाखल करण्यात आला होता.

नमुद दांखल गुन्हयाचा तपास गुन्हे शाखा, घटक-१; ठाणे कडून करण्यात येत असताना अटक आरोपी हा त्याचे लोकेशन सतत बदलुन पोलीसांना गुंगारा देत अनेक राज्यात फिरत होता. सदर गुन्हयाच्या तांत्रिक तपासामध्ये आरोपी हा घोडबंदर ठाणे येथे येणार असल्याबाबत गोपनिय बातमीदारामार्फत माहिती प्राप्त झाल्यानंतर मा. वरिष्ठांच्या सुचना व मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, घटक-१ ठाणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक दिपक घुगे व त्यांच्या पथकाने आरोपीस दिनांक २३/०३/२०२६ रोजी २०:२० वाजता अटक करण्यात आली. अटक आरोपीचे दिनांक ०२/०४/२०२६ रोजी पावेतोच्या पोलीस कोठडीचे दरम्यान तपास पथकाने आरोपीकडे केलेल्या कौशल्यपुर्वक तपासामध्ये अटक आरोपी याचेकडुन ठाणे व जिल्हा पाली, राज्य- राजस्थान येथे जावून खालीलप्रमाणे मुद्देमाल हस्तगत केला आहे.

अ.नु	ठाणेनगर पो. स्टे. गुन्हा रजिस्टर नंबर	हस्तगत मालमत्ता
०१	६५३/२०२५	१) १,३९,९७,१७७/- रूपये किंमतच्या एकुण १,२१५.७९ ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या ०५ लगडी .
०२	६४३/२०२५	१) ९०,००,०००/- रूपये किंमतच्या एकुण ७४२ ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या ०२ लगडी २) १७,५०,०००/- रूपये रोख रक्कम.

अटक आरोपीचे नाव :-

०१) जीवाराम वर्धाजी चौधरी, वय ४६ वर्षे, राह- जांभळी नाका, ठाणे व मुळगाव- मु.पो. सदरी, ता. बाली, जिल्हा पाली, राज्य - राजस्थान

सदरची कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त डॉ. श्री. पंजाबराव उगले, मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे श्री. अमरसिंह जाधव, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, शोध १, गुन्हे शाखा, ठाणे श्री. शेखर बागडे, यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सचिन गायकवाड, पोलीस उप निरीक्षक दिपक घुगे, श्रे. पो. उप निरी./ दिपक जाधव, सहा.पो.उप निरी. सुनिल माने, पोहवा/संदीप महाडीक, प्रशांत निकुंभ, अविनाश पाटील, शब्बीर फरास, पोशि/सागर सुरळकर, पोशि/ अमोल ढावरे, प्रशांत लवटे यांनी केली आहे.